# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

## (पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

दूरध्वनी : २५६०१२६१
फॅक्स : ०२०.२५६९९२३२

गणेशखिंड,
पुणे ४११००७.

संदर्भ: शै.प्रवेश/ ४३९२ दिनांक : २३/१०/२०१८

**तातडीचे/महत्वाचे**

प्रति,
मा. प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्नित महाविद्यालये/संस्था
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

विषय - महाडीबीटी पोर्टलवर लॉगईन करताना येणाऱ्या समस्यांबाबत.

संदर्भ - शासन पत्र क्र. ससं/उशि/पुवि/शिष्यवृत्ती/२०१८/२६०८ दि. २३/१०/२०१८

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयांस अनुसरून आपणांस कळविण्यात येते की, उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या शिष्यवृत्ती योजनांसाठी महाडीबीटी पोर्टल विकसित करण्यात आलेले आहे. सदर पोर्टलवर लॉगईन करण्यासाठी सर्व नोंदणीकृत महाविद्यालयांना युजरआयडी आणि पासवर्ड ईमेलव्दारे कळविण्यात आलेले आहेत. महाडीबीटी पोर्टलवर युजरआयडी आणि पासवर्ड टाकल्यानंतर लॉगईन होत नाही अशा सर्व महाविद्यालयांनी **ए. के. के. खान न्यू. लॉ ॲकॅडमी, आझम कॅम्पस, कॅम्प, पुणे** येथे गुरूवार **दि. २५/१०/२०१८** रोजी सकाळी **१०.३०** वाजता उपस्थित राहण्याबाबतच्या सुचना शासनाने दिलेल्या आहेत. सोबत शासन पत्राची प्रत जोडत आहोत.

तरी, शासनाने दिलेल्या सुचनेनुसार आपल्या महाविद्यालयातील संबंधित कर्मचाऱ्यास वरील ठिकाणी आवश्यक त्या कागदपत्रासह उपस्थित राहण्याबाबत सुचना देण्यात याव्यात.

कळावे,

आपला,
उपकुलसचिव,
शैक्षणिक प्रवेश विभाग

प्रत :— माहितीसाठी

मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.

मा. सहसंचालक, उच्च शिक्षण, पुणे विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे.

**महाराष्ट्र शासन**

**शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण**

१७, डॉ. आंबेडकर रोड, पुणे विभाग, पुणे ४११ ००१

Email Id – jdpunescholarship@gmail.com Website – www.jdhepune.info

फोन नं ०२०-२६१२७८३३ / २६०५१६३२ फॅक्स नं. ०२०-२६०५१६३२


जा.क्र. शिसस/उशि/पुवि/२०१८-१९/शिष्यवृत्ती/2608 दिनांक : २३.१०.२०१८

प्रति,

१. प्राचार्य,
 सर्व शासकीय/अशासकीय अनुदानित /विना अनुदानित/
 टप्पा अनुदानित/कायम विना अनुदानित वरिष्ठ महाविद्यालये,
 पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हा.

२. कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.

३. कुलसचिव, डेक्कन महाविद्यालय व पदव्युत्तर संस्था, पुणे.

४. कुलसचिव, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे.

५. कुलसचिव, गोखले अर्थशास्त्र व राज्यशास्त्र संस्था, पुणे.

विषय : - **महाडीबीटी पोर्टलवर लॉगईन करताना येणाऱ्या समस्यांबाबत...**

उपरोक्त विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या शिष्यवृत्ती योजनांसाठी **महाडीबीटी पोर्टल** विकसित करण्यात आले आहे. सदर पोर्टलवर लॉगईन करण्यासाठी सर्व संलग्नित महाविद्यालयांना युजरआयडी आणि पासवर्ड ईमेलद्वारे कळविण्यात आले आहेत. त्यामधील काही महाविद्यालयांना अद्यापही लॉग ईन करताना अडचणी येत आहेत. सदर महाविद्यालयांनी महाडीबीटी पोर्टलवर युजर आयडी आणि पासवर्ड टाकल्यानंतर लॉग ईन होत नाही. अशा सर्व महाविद्यालयांनी ए.के.खान लॉ कॉलेज, आझम कॅम्पस, पुणे ४११००१ येथे गुरुवारी दि. २५.१०.२०१८ रोजी सकाळी १०.३० वाजता न चुकता संबंधित कर्मचाऱ्याने उपस्थित रहावे. अनुपस्थित राहिल्यास कोणत्याही महाविद्यालयाची लॉग ईन संबंधीची तक्रार घेतली जाणार नाही किंवा त्यासंबंधी कोणतीही कार्यवाही त्यानंतर होणार नाही.

संबंधित कर्मचाऱ्याने येताना प्राचार्य आणि संबंधित लिपिकाचे आधार कार्ड, आधार कार्डशी लिंक असलेला मोबाईल नंबर आणणे आवश्यक आहे. जर कोणाकडे उपलब्ध नसेल किंवा लिंक नसेल तर त्या महाविद्यालयाचे लॉग ईन प्रोसेस पूर्ण होणार नाही. याची सर्वस्वी जबाबदारी महाविद्यालयाची राहील. तरी संबंधित लिपिकाने उपरोक्त कागदपत्रांसह उपस्थित रहावे.

(डॉ. विजय नारखेडे)
सहसंचालक, उच्च शिक्षण,
पुणे विभाग, पुणे

प्रत - मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे ४११००१ यांना माहितीस्तव सादर.